केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील साखर कारखान्यांनी एफ.आर.पी. प्रमाणे गळीत हंगाम २०२२-२३ साठी ऊस दर अदा करावयाचे धोरण निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र. ससाका २०२१ /प्र.क्र. १०१/२५ स,**
मंत्रालय, विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८/१०/२०२२.

वाचा : १) ऊस (नियंत्रण) आदेश १९६६
२) महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम २०१३ व त्याखालीलनियम २०१६
३) केंद्र शासन, ग्राहक व्यवहार, अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय, भारत सरकार यांची अधिसूचना क्रमांक सा.का.नि.६६३(अ)/आ.व./ई.ख दि. २२/१०/२०२०
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई -३२ शासन निर्णय क्र.ससाका २०२१/प्र.क्र.१०१ /२५-स,दि.२१.०२.२०२२.
५) केंद्र शासन, ग्राहक व्यवहार, अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय, भारत सरकार यांची अधिसूचना क्रमांक ३ (१)/२०२१-एसपी-१ दि.१७/०८/२०२२
६) साखर आयुक्त ,पुणे यांचे पत्र क्र. सा आ / कक्ष ७/हं २२-२३/ऊस दर अदायगी धोरण/२२/८६२,दि. ३०.०८.२०२२.

**प्रस्तावना :**

१. ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील कलम २ व ३ मध्ये ऊस दराबाबत( Fair and Remunerative Price- FRP ) (एफ.आर.पी.) तरतूद आहे. केंद्र शासन प्रत्येक वर्षी गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वी नवीन हंगामात कोणत्या दराने किमान एफ.आर.पी.ऊस दर द्यावा याबाबत अधिसूचना जारी करते. केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केला जाणारा ऊस दर हा कारखान्याच्या गेटजवळ आणून दिलेल्या ऊसासाठी असतो. उत्तर प्रदेश राज्यासह अन्य काही राज्यांमध्ये ऊसाची तोडणी व वाहतुक साखर कारखान्यांमार्फत केली जात नाही. तथापि, महाराष्ट्र राज्यात ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्यावतीने ऊस तोडणी व वाहतूकीचे काम साखर कारखान्यांमार्फत केले जाते. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात, केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या एफ.आर.पी. दरामधुन ऊस तोडणी व वाहतुकीसाठी कारखान्याने ऊस पुरवठादारांच्यावतीने केलेला खर्च वजा करून उर्वरीत रक्कम अदा केली जाते.

२. केंद्र शासनाने दि. २२/१०/२०२० च्या अधिसूचनेद्वारे राज्यातील साखर कारखान्यांची गाळप हंगाम २०१९-२० पासून एफ.आर.पी. जाहीर करण्याचे अधिकार संबंधित राज्य शासनास प्रदान केले आहेत. राज्य शासनाच्या पातळीवर एफ.आर.पी. निश्चित करण्यासाठीचे धोरण ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या अभ्यास गटाने केलेल्या शिफारशींबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय आणि ऊस नियंत्रण मंडळाचा सल्ला व निर्णयानुसार दि. २१/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील साखर कारखान्यांनी एफ.आर.पी. प्रमाणे ऊस दर अदा करावयाचे धोरण जाहीर केलेले आहे. सदर धोरणानुसार गाळप हंगाम २०२१ - २२ व त्यापुढील हंगामाकरीता एफ.आर.पी. प्रमाणे ऊस दर निश्चित करताना त्या त्या हंगामाचा अंतिम साखर उतारा आणि अंतिम ऊस तोडणी व वाहतुक खर्च विचारात घेणेबाबत निर्णय घेतलेला आहे. तसेच गाळप हंगाम २०२१-२२ व त्यापुढील हंगामांचा अंतिम साखर उतारा निश्चित होईपर्यंत, हंगाम सुरू झाल्यापासून गाळप केलेल्या ऊसासाठी सुरूवातीचा किमान एफ.आर.पी. ऊस दर निश्चित करताना आधारभूत धरावयाचा साखर उतारा महसूल विभागनिहाय निश्चित करण्यात आलेला आहे. सदर आधारभूत साखर उतारा विचारात घेऊन त्या त्या महसूल विभागातील साखर कारखान्यांनी केंद्र शासनाने त्या त्या हंगामासाठी अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या मुलभूत एफ.आर.पी.

दरानुसार हंगामाच्या सुरुवातीचा किमान एफ.आर.पी. ऊसदर निश्चित करून ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील कलम ३ नुसार अदा करण्याची कार्यवाही करण्याबाबत उक्त शासन निर्णयान्वये निर्देश दिलेले आहेत. तसेच,केंद्र शासनाकडून हंगाम २०२१-२२ नंतर एफ.आर.पी. दरात बदल झाल्यास उस नियंत्रण मंडळाच्या शिफारशीसह शासन मान्यतेने किमान आधारभूत साखर उतारा निश्चित करण्याबाबत निर्देश आहेत.

३. केंद्र शासनाने दि. १७/०८/२०२२ रोजीच्याअधिसूचनेद्वारे, गाळप हंगाम २०२२-२३ साठीचा किमान एफ.आर.पी. ऊस दर प्रसिध्द केलेला आहे. सदर अधिसूचनेद्वारे जाहिर केलेल्या ऊस दर विचारात घेता, गाळप हंगाम २०२१-२२ साठी जाहिर केलेल्या एफ.आर.पी. ऊस दरात बदल झालेला असून सदर दरासाठी विचारात घेतलेल्या बेसीक साखर उताऱ्यामध्येही बदल करण्यात आला आहे. सदर बदल आणि त्यासंदर्भातील दि.२१/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देश विचारात घेता, २०२२-२३ हंगामांचा अंतिम साखर उतारा निश्चित होईपर्यंत, हंगाम सुरू झाल्यापासून गाळप केलेल्या ऊसासाठी सुरूवातीचा किमान एफ.आर.पी. ऊसदर निश्चित करताना आधारभूत धरावयाचा किमान साखर उतारा ऊस नियंत्रण मंडळाच्या शिफारशीसह शासन मान्यतेने निश्चित करणे आवश्यक असल्याने शासनाने त्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय:**

१. गाळप हंगाम २०२२-२३ व त्यापुढील हंगामांचा अंतिम साखर उतारा निश्चित होईपर्यंत, हंगाम सुरू झाल्यापासून गाळप केलेल्या ऊसासाठी सुरूवातीचा किमान एफ.आर.पी. ऊस दर अदा करताना आधारभूत धरावयाचा साखर उतारा महसूल विभागनिहाय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | महसुल विभागाचे नाव | हंगामाचा अंतिम साखर उतारा निश्चित होईपर्यंत एफ.आर.पी. ऊस दर अदा करण्यासाठी आधारभूत धरावयाचा साखर उतारा |
|---|---|---|
| १ | पूणे व नाशिक | १०.२५ % |
| २ | औरंगाबाद, अमरावती व नागपूर | ९.५० % |

२. वरीलप्रमाणे आधारभूत साखर उतारा विचारात घेऊन त्या त्या महसूल विभागातील साखर कारखान्यांनी केंद्र शासनाने त्या त्या हंगामासाठी अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या मुलभूत एफ.आर.पी. दरानुसार हंगामाच्या सुरुवातीचा किमान एफ.आर.पी. ऊस दर निश्चित करून ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील कलम ३ नुसार अदा करण्याची कार्यवाही करावी.

३. आधारभूत धरावयाचा किमान साखर उतारा याव्यतिरिक्त इतर सर्व धोरणात्मक बाबी हया दि. २१/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

४. उपरोक्त आदेश गाळप हंगाम २०२२-२३ पासून लागू होतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१०१८१७५१२४२२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHINGADE ANKUSH PANDURANG

(अंकुश पां. शिंगाडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा. मंत्री (सर्व) मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) विधानपरिषद सदस्य /विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव ( वित्त ) , मंत्रालय, मुंबई-४०००३२
९) अपर मुख्य सचिव ( नियोजन ) , मंत्रालय, मुंबई-४०००३२
१०) अपर मुख्य सचिव ( सहकार व पणन ) , मंत्रालय, मुंबई-४०००३२
११) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल शिवाजी नगर, पुणे.( ३प्रती )
१२) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाष्ट्र राज्य, पुणे.
१३) सर्व जिल्हाधिकारी /साखर कारखाने/ ऊस नियंत्रण मंडळ सदस्य (साखर आयुक्त, पुणे यांच्यामार्फत)
१४) अध्यक्ष/ उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित, नरीमन पॉईट,मुंबई.
१५) अध्यक्ष, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
१६) अध्यक्ष, /उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित,मुंबई.
१७) महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, मांजरी, पुणे.
१८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादित, नरिमन पॉईट, मुंबई.
१९) सर्व कार्यकारी संचालक साखर कारखाने (साखर आयुक्त,पुणे यांच्यामार्फत)
२०) कार्यासन ३-स/२५-स संग्रहार्थ.